# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- १७८-२२ दिनांक :- ११/०६/२०२२

## अल्पवयीन मुलीची वेश्या व्यवसायातुन सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.

दिनांक १०.०६.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, महिला वेश्यादलाल रेखा सिंग रा. नवघर रोड, भाईंदर पुर्व हि तिच्या मोबाईलवरती संपर्क केला असता ती पैश्याच्या मोबदल्यात पुरुष गिऱ्हाईकांना अल्पवयीन मुली पुरविते.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री हंडोरे यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व पंच यांना जी/०१, तळ मजला, बी विंग, गणेश गल्ली, नवघर रोड, भाईंदर पुर्व येथे पाठवुन सत्यता पडताळुन दिनांक १०/६/२०२२ रोजी पोलीस पथकासह १५.३० वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल १) रेखा किसन सिंग/पाल, वय-४५ वर्ष हिने १७ वर्षाची अल्पवयीन मुलगी दाखवुन बोगस पुरुष गिऱ्हाईकाकडुन वेश्यागमनाची रक्कम स्वीकारल्याने तिस ताब्यात घेवुन एका अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात आली आहे. सदर बाबत उमेश पाटील, सहा.पोलीस उपनिरीक्षक यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन सदरील आरोपीतांविरुध्द भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. I ४४२/२०२२, भा.दं.वि.सं.कलम ३६६ (अ), ३७०(१)(४), ३७२ अ.व्या.प्रति.अधि. १९५६ चे कलम ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १७ व १८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. विजयकांत सागर, पोलीस उप.आयुक्त (मुख्यालय) अती. कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री देविदास हंडोरे, सपोउपनि उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पोशि/केशव शिंदे, व चा.पोहवा/सम्राट गावडे नेम- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर तसेच पोहवा/घरबुडे नेम- अंमली पदार्थ विरोधी कक्ष व मपोशि/धिंडे- सायबर सेल यांनी केली आहे.

---ooo---